# मोबाईल क्रमांक आधारशी कसा लिंक करावा / अपडेट करावा?

जर तुमचा मोबाईल क्रमांक आधारशी जोडलेला (Linked) नसेल, तर नोंदणीपूर्वी तो लिंक करणे आवश्यक आहे.

मोबाईल क्रमांक आधारशी लिंक करण्याची प्रक्रिया:

१. आपल्या जवळच्या आधार नोंदणी केंद्रावर /CSC केंद्रावर (Aadhaar Enrolment/Update Centre) जा.
२. मूळ आधार कार्ड आणि आवश्यक असल्यास वैध ओळखपत्र (Photo ID Proof) सोबत घ्या.
३. आधार अपडेट/दुरुस्ती फॉर्म (Aadhaar Update/Correction Form) भरून नवीन मोबाईल क्रमांक नमूद करा.
४. फॉर्म सादर करून बायोमेट्रिक पडताळणी (Biometric Verification) द्या.
५. काही दिवसांत तुमचा मोबाईल क्रमांक अपडेट झाल्याची SMS द्वारे पुष्टी (Confirmation) UIDAI कडून येईल.

आधार केंद्रास भेट सुनिश्चिती (Online Appointment):

- तुम्ही UIDAI च्या अधिकृत संकेतस्थळावरूनही भेटीची वेळ सुनिश्चित करू शकता: https://uidai.gov.in
- संकेतस्थळावर “Update Aadhaar” → “Update Aadhaar at Enrolment/Update Centre” या पर्यायावर जाऊन जवळचे केंद्र शोधू शकता.